# कुन्तकाच्या स्वभावोक्ती—मताची चिकित्सा

रेणुका बोकारे

कुन्तकाला 'वक्रोक्तिजीवित' ग्रंथाद्वारे वक्रोक्ती सिद्धांत प्रतिपादन करावयाचा होता. कुन्तकापूर्वी भामह, दण्डी, उद्‌भट इत्यादी आलंकारिकांनी स्वभावोक्ती अलंकाराचे विवेचन केले होते. विशेषतः दण्डीने वाङ्मयाचे स्वभावोक्ती आणि वक्रोक्ती असे विभाजन निरूपिले होते आणि स्वभावोक्तीला अलंकारत्व प्रदान केले होते. या सर्व पार्श्वभूमीवर कुन्तकाने आपल्या ग्रंथाद्वारे स्वभावोक्तीचे अलंकारत्व नाकारून वक्रोक्ती सिद्धांत प्रस्थापित करण्याची घोषणा केली –

**इत्यसत्तर्कसन्दर्भे स्वतन्त्रोऽप्यकृतादरः।**
**साहित्यार्थसुधासिन्धोः सारमुन्मीलयाम्यहम्।।**
**येन द्वितयमप्येतत् तत्त्वनिर्मितिलक्षणम्।**
**तद्विदामद्‌भुतामोदचमत्कारं विधास्यति।।**[1]

(स्वभाववाद्यांच्या) अशा प्रकारच्या स्वतंत्रा (स्वभावोक्तिवादाचे समर्थन करणा—या) अनुचित तर्क—वितर्कांची पर्वा न करता मी साहित्यार्थरूप सुधासागराचे सार असणारा वक्रोक्ती सिद्धांत प्रकाशित करीत आहे. ज्या ग्रंथाद्वारे (वक्रोक्ती) तत्त्वाची स्थापना आणि ते प्रतिपादन करणारा हा लक्षणग्रंथ हे दोन्ही ग्रंथपाठकाला – सहृदयाला अद्‌भुत आनंद आणि चमत्कार प्रदान करतील.

कुन्तकापूर्वी काव्याचे दोन दृष्टिकोन प्रचलित होते—

1. काव्यातील वस्तूचे स्वाभाविक स्वरूपात केलेले वर्णन काहींना आल्हाददायक वाटते.
2. काहींना वर्ण्यवस्तूला अलंकारांनी सजवून केलेले वर्णन चमत्कारजन्य वाटते.

   या दोन दृष्टिकोनांना अनुक्रमे स्वभावोक्तीवादी आणि वक्रोक्तीवादी म्हटले जाते.

कुन्तकाला स्वभावोक्ती हा 'अलंकार' म्हणून मान्य नसल्याने आणि 'वक्रोक्ती' हाच केवळ काव्याचा अलंकार आहे हे प्रस्थापित करावयाचे असल्याने त्याने स्वभाववाद्यांच्या विरोधात स्वतःचे मत आत्मविश्वासपूर्वक प्रकट करून ग्रंथाचा उपक्रम केला आहे.

**कुन्तकाचे स्वभावोक्ती विवेचन –**

पूर्वपक्षाने घेतलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने कुन्तक 'स्वभावोक्ती' विवेचनाकडे वळतो; त्याने स्वभावोक्ती हा 'अलंकार' नसून 'अलंकार्य' आहे, हे मत पुढील पाच कारिकांमध्ये मांडले आहे; त्याचा परामर्श पुढीलप्रमाणे –

पूर्वपक्ष म्हणतो, 'काव्याचा अलंकार वक्रोक्तीच असे कसे म्हणता? कारण दण्डी इत्यादी पूर्वाचार्यांनी स्वभावोक्ती हा देखील अलंकार मानला आहे आणि तो देखील अतीव रमणीय आहे.'

'ननु च किमिदं प्रसिद्धार्थविरुद्धं प्रतिज्ञायते, यद्वक्रोक्तिरेवालङ्कारो नान्यः कश्चिदिति। यतश्चिरन्तनैरपरं स्वभावोक्तिलक्षणमलङ्करणमाम्नातम्। तच्चातीवरमणीयम्।'[2]

पूर्वपक्षाच्या वरील प्रश्नावर उत्तर देताना कुन्तक म्हणतो –

**अलङ्कारकृतां येषां स्वभावोक्तिरलंकृतिः।**
**अलङ्कार्यतया तेषां किमन्यदवतिष्ठते।। 3(व. जी. 1/11)**

ज्या (दण्डी इत्यादी) आलंकारिकांनी, पूर्वाचार्यांनी स्वभावोक्तीला अलंकार मानले; त्यांच्या मते, मग अलंकार्य ते कोणते? अलंकार्यरूप स्वभावच जर अलंकार मानला तर अलंकार्य कोणाला मानावयाचे? अर्थात् स्वभाव हा अलंकार्य असतो; परंतु जर त्या अलंकार्यरूप स्वभावाला अलंकार मानले तर ज्याला अलंकृत करावयाचे अशी स्वभावभिन्न कोणती वस्तू काव्याच्या शरीरस्थानी उरणार? म्हणजेच अलंकार्य ते काय उरणार? असा उलट प्रश्न कुन्तकाने केला आहे.

स्वभावोक्ती म्हणजे स्वभावाचे वर्णन – 'स्वभाव एवोच्यमानः।' स्वभाव हाच वर्ण्यविषय. स्वभावोक्तीचा प्रस्तुत अर्थ सांगून कुन्तक पुढे म्हणतो – स एव यद्यलङ्कारस्तत्किमन्यत् तद्व्यतिरिक्तं काव्यशरीरकल्पं वस्तु विद्यते यत्तेषामलङ्कार्यतया विभूष्यत्वेनावतिष्ठते पृथगवस्थितिमासादयति। न किचिदित्यर्थः।[3] 4'स्वभावाचे वर्णन' हेच अलंकार्य असल्याने त्याला अलंकार मानणे उचित नाही, असा कुन्तकाचा अभिप्राय आहे.

पूर्वपक्ष पुन्हा शंका उपस्थित करतो – पूर्वी तुम्ही 'तत्त्वं सालंकारस्य काव्यता' 5(व.जी. 1/6) या कारिकान्वये अलंकार्य आणि अलंकार या भेदाने रहित सालंकृत शब्दार्थच काव्य होत असे म्हटले. अर्थात् कुन्तक स्वतः अलंकार–अलंकार्य भेद मानत नसताना स्वभावोक्तीच्या संदर्भात अलंकार –अलंकार्य भेद कसा बरे सांगतो?

'ननु च पूर्वमवस्थापितं यत्, वाक्यस्यैवाविभागस्य सालङ्कारस्य काव्यत्वमिति (1/6) तत्किमर्थमेतदभिधीयते? या शंकेवार उत्तर देताना कुन्तक म्हणतो, सत्यम्। किन्तु तत्राासत्यभूतोऽपि, अपोद्धारबुद्धिविहितो विभागः कर्तुं शक्यते वर्णपदन्यायेन वाक्यपदन्यायेन चेत्युक्तमेव।'[4] [6]

आम्ही अलंकार–अलंकार्य भेद मानीत नाही हे खरे! परंतु केवळ विवेचन करण्यासाठी, समजावून सांगण्यासाठी अलंकार–अलंकार्य यांचे वेगवेगळे विवेचन केले जाते. ज्याप्रमाणे व्याकरणशास्त्राात पदाचे अवयव असणा–या वर्णांना स्वतंत्रा स्थान नाही किंवा वाक्यातील पदांना स्वतंत्रापणे स्थान नसते परंतु तरीही प्रकृति, प्रत्यय, क्रिया, कारक इत्यादी व्यवहार केले जातात त्याचप्रमाणे काव्यात अलंकार–अलंकार्य हा भेद नसतो परंतु केवळ विवेचनासाठी, समजावून सांगण्यासाठीच तो विभाग करावा लागतो. सारांश, अलंकार–अलंकार्य भेद शास्त्रातः विवेच्य आणि आस्वाद्यतः अविवेच्य आहे, असा कुन्तकाच्या म्हणण्याचा रोख आहे.

स्वभावरहित वस्तू वर्णनाचा विषय होत नाही हा मुद्दा स्पष्ट करताना कुन्तक म्हणतो –

**स्वभावव्यतिरेकेण वक्तुमेव न युज्यते।**
**वस्तु तद्रहितं यस्मान्निरुपाख्यं प्रसज्यते।। 7(व.जी. 1/12)**

स्वभावोक्तीला जर अलंकार मानले तर त्या स्वभावाव्यतिरिक्त अन्य कोणते अलंकार्य असणार? स्वभावाशिवाय कोणत्याही वस्तूचे वर्णन करणे संभवत नाही. कारण स्वभावरहित वस्तू वर्णनाचा विषय होत नसल्याने ती निरुपाख्य ठरते म्हणून स्वभावोक्ती हा अलंकार होऊ शकत नाही. कुन्तकाच्या मते, वर्ण्यविषय हा नेहमीच काव्यशरीरस्थानीय असतो, म्हणजेच अलंकार्यरूप असतो. स्वभाव हा वर्ण्यविषय असल्याने तो अलंकार्य ठरतो, अलंकार नाही. **'स्वभाव' शब्दाची कुन्तकाने दिलेली व्युत्पत्ती पुढीलप्रमाणे – 'भवतोऽस्मादभिधानप्रत्ययौ इति भावः, स्वस्यात्मनो भावः स्वभावः। तेन स एव यस्य कस्यचित् पदार्थस्य प्रख्योपाख्यावतारनिबन्धनम्। तेन वर्जितं असत्कल्पं वस्तु शशविषाणप्रायं शब्दज्ञानागोचरतां प्रतिपद्यते। स्वभावयुक्तमेव सर्वथाभिधेयपदवीमवतरतीति शाकटिकवाक्यानामपि सालङ्कारता प्राप्नोति, स्वभावोक्तियुक्तत्वेन।'[8]**

'ज्यामुळे अर्थाचे कथन किंवा अभिधान आणि ज्ञान होते तो 'भाव' होय; 'स्व' म्हणजे स्वतःचा भाव अर्थात् स्वरूप. ज्यामुळे पदार्थाचे कथन

आणि ज्ञानरूप व्यवहार होतो तो स्वभाव होय. हा स्वभावच सर्व पदार्थांच्या ज्ञानाचे आणि कथनरूप व्यवहाराचे कारण आहे. स्वभावरहित वस्तू ही शशशृंगाप्रमाणे शब्दार्थांचे ज्ञान करून देण्यास समर्थ ठरत नाही म्हणून स्वभावयुक्त वस्तूच कथन करण्यायोग्य असते आणि या स्वभावाला जर अलंकार मानण्याचा आग्रह धरला तर स्वभावोक्तीने युक्त असल्याने गाडीचालकाच्या वाक्यांना देखील सालंकारता प्राप्त होईल, आणि म्हणूनच स्वभावोक्ती हा 'अलंकार' मानणे सयुक्तिक ठरत नाही. या मुद्याच्या स्पष्टीकरणार्थ कुन्तकाने पुढील कारिकेत दृष्टांत दिला आहे –

**शरीरं चेदलङ्कारः किमलंकुरुतेऽपरम्।**
**आत्मैव नात्मनः स्कन्धं क्वचिदप्यधिरोहति।।9 (व.जी. 1/13)**

काव्याच्या शरीरस्थानी असणारा अलंकार्यरूप स्वभावच जर अलंकार झाला तर अलंकार्य ते काय उरले? आणि तो स्वभावोक्ती अलंकार कोणत्या अलंकार्याला अलंकृत करणार? कारण स्वभाव हाच अलंकार्य आणि या स्वभावरूप अलंकार्याला अलंकृत करणारा अलंकारही स्वभावोक्ती, हे कदापि शक्य नाही कारण या जगात कोणी स्वतःच स्वतःच्या खांद्यावर चढू शकत नाही.

जर इतरांच्या समाधानासाठी आपण स्वभावोक्ती हा अलंकार मानला तरी ते योग्य नाही त्याचे कारण कुन्तक पुढील कारिकेत विशद करतो –

**भूषणत्वे स्वभावस्य विहिते भूषणान्तरे।**
**भेदावबोधः प्रकटस्तयोरप्रकटोऽथवा।।**

**स्पष्टे सर्वत्रा संसृष्टिरस्पष्टे सङ्करस्ततः।**
**अलङ्कारान्तराणां च विषयो नावशिष्यते।। 10(व.जी. 1/14–15)**

काव्यात स्वभावोक्ती अलंकार मानल्यास त्या व्यतिरिक्त उपमादी अलंकारांचा काव्यात सन्निवेश असल्यास त्यांच्यातील भेदाचे ज्ञान स्पष्टतः होईल की अस्पष्टतः? यावर उत्तर देताना कुन्तक म्हणतो, स्वभावोक्ती आणि उपमादी अलंकारांमधील भेदाचे ज्ञान स्पष्टपणे झाले तर संसृष्टी अलंकार होईल आणि त्यांच्यातील भेदाचे ज्ञान अस्पष्ट झाल्यास संकर अलंकार होईल; अर्थात् संकर अलंकार झाल्यास उपमादी अलंकारांची काही उपयुक्तताच राहणार नाही; ते शुद्ध स्वरूपात आस्वाद्य ठरणार नाही. थोडक्यात दण्डी इत्यादी जे आलंकारिक स्वभावोक्तीला स्वतंत्र अलंकार मानतात त्यांना उपमादी अलंकार केवळ संकर किंवा संसृष्टी स्वरूपातच

उपलब्ध होतील. उपमादी अलंकारांची स्वतंत्र सत्ता संपुष्टात येईल असा कुन्तकाचा अभिप्राय आहे. आकाशचर्वण जितके अशक्य आहे त्याचप्रमाणे स्वभावोक्तीच्या अलंकारत्वाविषययी लिहिणे व्यर्थ असल्याचा निर्वाळा कुन्तकाने या विषयाच्या समारोपादाखल दिला आहे 'तैरेवालङ्कारकारैस्तस्यार्थस्यानङ्गीकृतत्वात् इत्यनेनाकाशचर्वणप्रतिमेनालमलीकनिबन्धनेन ।'[6] 11कुन्तकाच्या मते, वस्तूचा सहृदयाल्हादकारी स्वभाव काव्याच्या शरीरस्थानीय रूपात अर्थात् अलंकार्य रूपातच वर्णनास पात्रा ठरतो. हे स्वभावरूप अलंकार्य विविध अलंकारांनी युक्त होऊन रसिकांना आस्वाद्य ठरते.

कुन्तकाच्या स्वभावोक्ती विचारातील ठळक मुद्दे सारांशरूपाने पुढीलप्रमाणे –

1. स्वभावोक्ती म्हणजे वस्तूच्या स्वरूपाचे/स्वभावाचे कथन. 'स्वभाव' शब्दाचा अभिप्राय असा की, ज्याद्वारे पदार्थाचे कथन किंवा ज्ञान होते म्हणूनच कोणत्याही वस्तूचे वर्णन हे वस्तुतः तिच्या स्वभावाचेच वर्णन असते. कारण स्वभावरहित वस्तू वर्णनास पात्रा नसते. वस्तूवर्णन हे मूलतः स्वभाववर्णनच म्हणजे स्वभावोक्तीच असते.
2. व्यवहार आणि शास्त्राात सर्वच वस्तूंचे वर्णन केले जाते. परंतु काव्यात मात्रा स्वभावतःच सुंदर वस्तूंचे वर्णन केले जाते; जी वस्तू स्वभावतःच सुंदर असते तीच काव्याचा वर्ण्यविषय ठरते आणि वर्ण्यविषय असल्याने तो स्वभाव अलंकार्य ठरतो, अलंकार नाही.
3. स्वभाववर्णन हा जर अलंकार असेल तर रिक्षाचालकाची सामान्य वाक्येही 'अलंकार' म्हणविली जातील.
4. स्वभाव हाच जर अलंकार मानला तर 'अलंकार्य' ते काय उरणार? अलंकार हे शरीरावर धारण केले जातात. अलंकार्यरूप शरीरच जर अलंकार असेल तर ते स्वतःच स्वतःला कसे धारण करू शकणार?
5. जर स्वभावोक्ती 'अलंकार' मानला तर उपमादी सर्व अलंकारांमध्ये त्याची अवस्थिती मानावी लागेल कारण स्वभाव–कथन तर सर्वच वर्ण्यविषयांमध्ये अनिवार्य असते. अशा स्थितीत एकही शुद्ध अलंकार राहणार नाही; स्वभावोक्तीच्या योगे उपमादी अलंकार संसृष्टी किंवा संकर अलंकारात परिणत होतील.

कुन्तकाच्या स्वभावोक्ती मताची चिकित्सा करण्यापूर्वी भामह, दण्डी, भोज आणि मम्मट इत्यादी आलंकारिकांच्या स्वभावोक्तीविषयक मतांचा आढावा घेणे सयुक्तिक ठरेल.

**भामह** – भामहाने स्वभावोक्ती अलंकाराचे लक्षण पुढीलप्रमाणे केले आहे –

**स्वभावोक्तिरलङ्कारः इति केचित्प्रचक्षते।**

अर्थस्य तदास्थत्वं स्वभावोΣभिहितो यथा।। 12काव्यालंकार, 2/93

काही आलंकारिकांनी 'स्वभावोक्ती' नामक अलंकार वर्णन केला आहे. अर्थाचे यथावत् कथन हा 'स्वभाव' म्हटला जातो.

या लक्षणाद्वारे भामह 'स्वभावोक्ती' अलंकार मानतो हे स्पष्ट होते. भामहाच्या मते वक्रोक्ती आणि स्वभावोक्ती यांच्यामध्ये विरोध नाही. 'वक्र' शब्दाचा अर्थ स्वभावाहून भिन्न किंवा अस्वाभाविक नाही. वक्र म्हणजे सामान्याहून भिन्न, विशिष्ट. स्वभावोक्ती विशिष्टतेचा सद्भाव असतो. स्वभावोक्तीत वस्तूच्या स्वभावतः सुंदर गुणांचे वर्णन असते. सामान्य गुणांचे यथावत् वर्णन ही स्वभावोक्ती न होता 'वार्ता' मात्रा ठरते. स्वभावोक्तीमध्ये कवी स्वप्रतिभेने वस्तूच्या रम्यतेचे ग्रहण आणि अरमणीयतेचा त्याग करतो. या अर्थाने स्वभावोक्ती अलंकारात वक्रता अथवा विशिष्टता अस्तित्वात असल्याने तो अलंकार ठरतो.

**दण्डी** – दण्डीने स्वभावोक्तीचे विस्ताराने विवेचन केले आहे. त्याने जाति, द्रव्य, गुण आणि क्रिया यांच्या आधारावर स्वभावोक्तीचे चार भेद विशद केले. दण्डीच्या मतानुसार स्वभावोक्ती 'जाति' चा पर्याय आहे –

**नानावस्थं पदार्थानां रूपं साक्षात् विवृण्वती।**
**स्वभावोक्तिश्च जातिश्चेत्याद्या सालङ्कृतिर्यथा।। 13काव्यादर्श, 2/8**

पदार्थांचे विविध अवस्थांमध्ये स्वरूप हुबेहूब दृष्टीपुढे उभा करणारा प्राथमिक अलंकार 'स्वभावोक्ती' किंवा 'जाति' म्हटल्या जातो.

दण्डीने स्वभावोक्तीची सत्ता वक्रोक्तीहून पृथक् मानली आहे –

**भिन्नं द्विधा स्वभावोक्तिर्वक्रोक्तिश्चेति वाङ्मयम्।**
**14(काव्यादर्श,2/363)**

दण्डीने स्वभावोक्तीचे साम्राज्य मूलतः शास्त्राात मानले आहे. स्वभावोक्तीमध्ये वस्तूच्या पदार्थांच्या गुणांचे प्रकृत वर्णन असते. त्यांचे अनारोपित प्रकृतरूप

वर्णन स्वभावतःच आकर्षक असल्याने स्वभावोक्ती 'अलंकार' पदवीस पात्रा ठरते आणि काव्यातही वांछनीय मानली जाते.

**भोज** – भोजाने स्वभावोक्तीच्या संदर्भात प्रचलित मतांचे समन्वयात्मक विवेचन केले. त्याने स्वभावोक्ती अलंकाराचे जाति नावाने ग्रहण केले आणि त्याची व्युत्पत्तीमूलक परिभाषा दिली –

**नानावस्थासु जायन्ते यानि रूपाणि वस्तुनः।**
**स्वेभ्यः स्वेभ्यः निसर्गेभ्यः तानि जातिं प्रचक्षते।।**
**15(सरस्वतिकण्ठाभरण, 3/45)**

जातीच्या अंतर्गत वस्तूच्या अशा रूपांचे वर्णन येते की, जे आपल्या स्वभावाहून भिन्न भिन्न अवस्थांमध्ये उत्पन्न होते. भोजाने वस्तूच्या आगंतुक, तात्कालिक स्वरूपाचे वर्णन स्वभावोक्ती अलंकाराच्या अंतर्गत मानले आहे. भोजाने दण्डीच्या वाङ्मय विभाजनाचा विस्तार केला –

वक्रोक्तिश्च रसोक्तिश्च स्वभावोक्तिश्चेति वाङ्मयम्।16

यानुसार अलंकारप्रधान साहित्य वक्रोक्तिमध्ये, रसभावादीप्रधान रसोक्तीच्या अंतर्गत तर गुणप्रधान साहित्य स्वभावोक्तीच्या अंतर्गत येते.

**मम्मट** – मम्मटाने केलेले स्वभावोक्तीचे लक्षण असे –

स्वभावोक्तिस्तु डिम्भादेः स्वक्रियारूपवर्णनम्। 17[7]

बालकादिकांच्या वैशिष्टयपूर्ण (स्व) क्रिया व स्वरूप यांचे (हुबेहूब) वर्णन म्हणजे स्वभावोक्ती (अलंकार) होय.

'स्वक्रियारूप' या शब्दावरील वृत्तीत मम्मट म्हणतो – 'स्वयोः तदेकाश्रययोः। 'रूपम्' वर्णः संस्थानं च । 'स्व' म्हणजे आपली अर्थात् खास त्यांचीच, 'रूपम्' म्हणजे रंग आणि ठेवण किंवा आकारविशेष. स्त्रिाया, पशुपक्षी, वृक्षलता इत्यादिकांच्या हालचाली (क्रिया), रंगरूप, ठेवण या धर्मांचे वर्णन म्हणजे स्वभावोक्ती; पण या वर्णनाला अलंकारत्व येण्यासाठी दोन अटी पूर्ण करणे आवश्यक असल्यचे प्रा. अर्जुनवाडकर व प्रा. मंगरूळकरांनी काव्यप्रकाशात नमूद केले आहे[8 18] –

1. वर्ण्यपदार्थाचे धर्म वैशिष्टयपूर्ण असाचे अर्थात् ठळकपणे त्या त्या वस्तूवरच राहणारे असावे.
2. चमत्कृती–रंजकता

या दोन अटी पूर्ण झाल्या तरच स्वभावोक्तीला अलंकारत्व प्राप्त होते.

कुन्तकाच्या आणि पूर्वोत्तरसूरींच्या मतांच्या पार्श्वभूमीवर **कुन्तकाच्या स्वभवोक्तीमताची चिकित्सा** पुढीलप्रमाणे –

1. कुन्तक स्वभावोक्ती आणि वक्रोक्ती यांना परस्पर विरुद्ध स्वभावाच्या उक्ती समजतो. स्वभावोक्ती म्हणजे वस्तूचे यथातथ्य वर्णन; त्यामुळे त्यात कुठलीच चमत्कृती किंवा उक्तिवैचित्रय नसते असे कुन्तकाचे मत आहे. तसे त्याने गंथाच्या मंगलाचरणाच्या श्लोकातच 'वैचित्रयचित्राकर्म' या शब्दात ग्रंथप्रयोजन स्पष्टच केले आहे. त्यामुळे कुन्तकाला स्वभावोक्ती मान्य नाही हे प्रारंभीच दिसून येते. 'स्वभावोक्ती आणि वक्रोक्ती या परस्पर विरुद्ध स्वभावाच्या उक्ती नाहीत. .....या दोन्ही उक्ती प्रतिभेचेच आविष्कर असतात. दोहोंमध्ये असामान्यता किंवा अलौकिकता असते. स्वभावोक्तीत कवी वस्तूस्वभावाचे यथातथ्य वर्णन करतो हे खरे पण ती यथातथ्यता म्हणजे आपल्याला भासणा–या वस्तूचे स्थूल किंवा सामान्य रूप नव्हे. कविप्रतिभेला दिसलेला वस्तूस्वभाव विशेष रूपाचा आणि म्हणून सामान्य रूपाहून अगदी वेगळा असतो.'[9] महिमभट्टाने 'व्यक्तिविवेक' ग्रंथात स्वभावोक्तीचे मर्म पुढील कारिकांमध्ये सांगितले आहे –

**उच्यते वस्तुनस्तावद् द्वैरूप्यमिह विद्यते।**
**तत्रौकमत्रा सामान्यं यद्विकल्पैकगोचरः।।**
**स एव सर्व शब्दानां विषयः परिकीर्तितः।**
**अत एवाभिधेयं ते सामान्यं बोधयन्त्यलम्।।**
**विशिष्टमस्य यद्रूपं तत् प्रत्यक्षस्य गोचरः।**
**स एव सत्कविगिरां**
**गोचरः प्रतिभाजुषाम्।। 19 (व्यक्तिविवेक, 2/114–116)**

वस्तूचे स्वरूप दोन प्रकारचे असते; एक सामान्य आणि दुसरे विशेष. यापैकी वस्तूचे सामान्यरूप केवळ विकल्पाचा विषय आहे. आपल्याला शब्दावरून जे विकल्पात्मक ज्ञान होते तेच वस्तूचे सामान्य रूप होय. म्हणून शब्दावरून वस्तूच्या केवळ सामान्य, स्थूल आणि अस्पष्ट रूपाचा बोध होतो. प्रतिभावान कवीला त्याचे दर्शन होते आणि त्या प्रतिभावेशातून प्रकट झालेल्या शब्दातूनच ते रसिकाला गोचर होते. सामान्यांच्या सामान्य शब्दातून नव्हे; याचे कारण असे की –

**रसानुगुणशब्दार्थचिन्तास्तिमितचेतसः।**
**क्षणं स्वरूपस्पर्शोत्था प्रज्ञैव प्रतिभा कवेः।।**
**सा हि चक्षुर्भगवतस्तृतीयमिति गीयते।**

**येन साक्षात्कारोत्येष भावांस्त्रौलोक्यवर्तिनः।।**
**अर्थस्वभावस्योक्तिर्या सालङ्कारतया मता।**
**यतः साक्षादिवाभान्ति तत्रार्थाः प्रतिभार्पिताः।।20**
**(व्यक्तिविवेक, 2/117, 118, 120)**

रसानुगुण शब्दार्थांच्या चिंतनात कवी गढून गेला असता त्याची प्रज्ञा वस्तूस्वरूपाच्या क्षणैक स्पर्शाने सुद्धा स्फुरित होते. ही प्रज्ञा म्हणजेच प्रतिभा होय. भगवान शंकराचा तृतीय नेत्रा तो हाच! या प्रातिभ दृष्टीमुळेच कवीला त्रौलोक्यगत सर्व भावांचे दर्शन होते. अशा प्रतिभावेशात उल्लिखित झालेल्या पदार्थाचे रूप कवीच्या उक्तीतून समर्पित होते. तेव्हा ते प्रत्यक्ष प्रकट झाल्याचा प्रत्यय येतो. अर्थस्वभावाला प्रकट करणारी अशी उक्ती म्हणजे स्वभावोक्ती होय. पदार्थाचा प्रतिभागोचर रूपविशेष साक्षात्कृत करणे हे स्वभावोक्तीचे कार्य होय.

अशाप्रकारे महिमभट्टांनी स्वभावोक्तीचे अंतरंग उलगडून दाखविले आहे.

**स्वभावोक्ती म्हणजे वस्तूचे यथातथ्य वर्णन नसून सामान्य वस्तूतील असामान्यत्व, पदार्थाचे विशिष्ट रूप सहृदयांसमोर प्रकट करणे होय. यासाठी अर्थातच गरज असते ती प्रतिभेची, विदग्धतेची! आणि म्हणूनच स्वभावोक्ती ही त्याज्य किंवा उपेक्षणीय नसून ती देखील कवीच्या प्रतिभेचा, विदग्धतेचा अलौकिक आविष्कार असल्याने आस्वादनीय आणि ग्राह्य ठरते.** स्वभावोक्तीच्या पुढील उदाहरणांमधून महिमभट्टाचे उपर्युक्त कथन अधिक स्प्ष्ट करता येईल –

महाकवी कालिदासाच्या 'अभिज्ञानशाकुंतल' या नाटकातील पुढील उदाहरण हे स्वभावोक्तीचे आहे –

**चलापाङ्गां दृष्टिं स्पृशसि बहुशो वेपथुमतीं**
**रहस्याख्यायीव स्वनसि मृदु कर्णान्तिकचरः।**
**करौ व्याधुन्वत्याः पिबसि रतिसर्वस्वमधरं**
**वयं तत्त्वान्वेषान्मधुकर हतास्त्वं खलु कृती।।**
**21(अभिज्ञानशाकुन्तल, 1/24)**

शकुंतला आपल्या दोन मैत्रिणींसह तपोवनातील वृक्षवेलींना पाणी घालीत होती आणि दुष्यंत झाडाआड उभा राहून शकुंतलेकडे निरखून पाहात होता आणि 'ही कोण?, कोणाची?' इत्यादी विचार करीत होता. तेवढयात एक भ्रमर वेलीवरून उडून शकुंतलेच्या मुखाभावेती घोटाळू लागला. भयग्रस्त शकुंतला त्याला दूर करू पाहात होती. पण तो पुन्हा पुन्हा तिच्या मुखाभोवती फिरत होता. हे पाहून दुष्यंत त्या भ्रमराला म्हणतो,

'हे भमरा, ज्यांचे अपांग चंचल आहेत आणि जे रोमांचित झाले आहेत अशा नेत्रांना तू वारंवार स्पर्श करतोस; रहस्य सांगणा—या (प्रियकरा)प्रमाणे तू कानाशी लागून नाजूकपणे गुंजारव करतोस; हाताने ती अडवत असतानाही प्रेमाचे सर्वस्व असलेल्या तिच्या अधराचे तू पान करतोस! आम्ही मात्रा (ही कोण, कुठली) या वस्तुस्थितीचा अजून शोधच करीत बसलो आहोत; तू मात्रा खरोखरी कृतार्थ झालास!'

कालिदासाच्या या प्रसिद्ध श्लोकात 'भ्रमरस्वभावोक्ती' आहे पण भ्रमराचे हे कविकृत वर्णन म्हणजे प्राणिशास्त्राज्ञाने वर्णिलेला भ्रमरव्यापार नव्हे; विदग्धाचे स्वाभिप्राय प्रकाशन आहे. म्हणूनच ते सहृदयांना आनंद देते. भ्रमराच्या हालचालींचे सौंदर्यपूर्ण, विदग्धतापूर्ण वर्णन या श्लोकात कवीने केले असल्याने ते आस्वाद्य ठरले आहे.

सारांश, स्वभावोक्तीला प्रतिभेची, विदग्धतेची आवश्यकता असते; स्वभावोक्तीत विदग्धता नसेल तर ते काव्य असू शकत नाही. वस्तूचे यथातथ्य वर्णन हे काव्यसंज्ञेस पात्रा ठरत नाही हे पुढील उदाहरणावरून दिसून येते —

**दीर्घपुच्छश्चतुष्पादः ककुद्मातः लम्बकम्बलः।**
**गोरपत्यं बलीवर्दः घासमत्ति मुखेन सः।।**[10] [22]

लांब शेपूट आहे, चार पाय आहेत, मोठे वशिंड आहे आणि अंगावर लांब झूल आहे, असा हा बैल गाईचे अपत्य आहे आणि तो मुखाने गवत खात आहे.

या पद्यात बैलाच्या स्वरूपाचे आणि क्रियेचे हुबेहूब वर्णन आहे; पण ते ग्राम्य आहे म्हणून त्यात काव्य नाही.

अशाप्रकारे स्वभावोक्तीला प्रतिभेची, विदग्धतेची आवश्यकता असते हे स्पष्ट होते.

2. कुन्तक स्वभावोक्तीत यथातथ्य वर्णन असल्याने त्यात कुठलीही चमत्कृती नाही असे मानतो; अत एव स्वभावोक्तीला 'अलंकार' मानत नाही तर अलंकार्य मानतो. त्याच्या मते, स्वभावोक्तीला अलंकार मानल्यास सामान्य जनांनी बोललेली वाक्ये ही देखील अलंकार पदवीस पात्रा ठरतील. कारण वस्तूवर्णनाशिवाय स्वभावकथन संभवत नाही. या मुद्यावरचे महिमभट्टाचे स्पष्टीकरण आपण पाहिलेच आहे. स्वभावमात्राांचे वर्णन म्हणजे स्वभावोक्ती नव्हे तर स्वभावोक्तीत वर्ण्य पदार्थांच्या सामान्य धर्माचा त्याग करून, त्यांच्या वैशिष्टयपूर्ण, ठळक धर्मांचे ग्रहण अपेक्षित असते. कवी स्वप्रतिभेने सामान्यजनांना न दिसणारे असे पदार्थांचे विशिष्ट रूप

स्वभावोक्तीद्वारे आपल्यासमोर मांडतो, वर्णन करतो त्यामुळे अर्थातच वर्णनात चमत्कृती उत्पन्न होते. वर्ण्य पदार्थाचे विशिष्ट रूप आणि चमत्कृती या दोन्ही अटींची पूर्तता झाल्याने स्वभावोक्ती अलंकार पदवीस पात्रा ठरते; अलंकार्य नाही.

**3.** कुंतकाच्या मते, रमणीय स्वभाव हा अलंकार्य आहे; अलंकार नव्हे. तो जर अलंकार मानला तर अलंकार्य ते काय उरले? अलंकार म्हणजे अलंकरणाचे साधन परंतु ते तर शरीरस्थानी आहे; स्वभावोक्ती हे अलंकार्यच असल्याने त्या स्वभावाला अलंकारत्व कसे काय दिले जाऊ शकते? अलंकारही स्वभाव आणि अलंकार्यही स्वभाव हे कसे संभवू शकते? यावर उत्तर असे की, स्वभावोक्ती हा कवीने केलेल्या लोकावेक्षणाचा निकष आहे. त्याला काव्यात अलंकृती म्हणून स्थान असणे न्याय्य आहे. 'स्थावरजंगमात्मकलोकवृत्त' हे जेव्हा स्वतःच रंजक असते, तेव्हा ते टिपून त्याचा काव्यात 'वक्रोक्ती'चा अवलंब न करता यथायोग्य सन्निवेश करणे म्हणजे काव्य अलंकृत करणे होय. **शोभाकर मित्राने 'अलंकाररत्नाकर' या ग्रंथात कुन्तकाच्या उपर्युक्त आक्षेपाला समर्पक उत्तर दिले आहे – द्विविधः वस्तुनः स्वभावः – स्थूलः सूक्ष्मश्च। तत्रा कवितृमात्रा (सर्वकवि) गोचरः स्थूलः। तस्य वर्णने न कश्चित् अलंकारः, सर्वस्य काव्यस्य स्वभावोक्तिप्रसंगात् सम्यक् वर्ण्यमानस्तु स्वभावः सूक्ष्मः। स तु महाकविगोचरः तस्य सम्यक् वर्ण्यमानस्य अन्यूनातिरिक्तत्वेन स्वभावोक्तिः। न तु साधारण रूपक्रियादेः तत्तब्दालादिगतस्य शब्देन प्रतिपादनम्। अपि तु यथैव वस्तु तथैव प्रतिपादनम् इति वस्तुसंवादिनी यत्रा शब्दात् प्रतिपत्तिः भवति, तत्रौव अलंकारः।**[11] [23]
या परिच्छेदाचा आशय महिमभट्टाच्या उपरोल्लिखित विवेचनातून तसेच महाकवी कालिदासाच्या अभिज्ञानशाकुंतलातील उदाहरणातून स्पष्ट झाल्याने येथे वेगळा देण्याची आवश्यकता नाही.

4. स्वभावोक्ती अलंकार की अलंकार्य हा वाद स्वभावोक्ती या संज्ञेचा अर्थ दोन्ही पक्षांनी वेगवेगळा घेतल्यामुळे उत्पन्न झाल्याचे दिसून येते. स्वभावोक्तीचा सामान्य अर्थ स्वाभाविक उक्ती अर्थात् नैसर्गिक, सरळ, साधे, वस्तुनिष्ठ वर्णन असा होतो. याच अभिप्रायाने दण्डीने वा≥मयाचे स्वभावोक्ती आणि वक्रोक्ती (ढंगदार वर्णन) असे दोन भाग केले आहेत. कुन्तकाने स्वभावोक्तीचा हाच अर्थ गृहित धरून तिच्या अलंकारत्वावर आक्षेप घेतला आहे. पण मम्मटादी आलंकारिक स्वभावोक्तीला अलंकार मानतात तेव्हा त्यांना स्वभावोक्ती या शब्दाच्या 'बालकादिकांच्या वैशिष्ट्यपूर्ण धर्मांचे वर्णन'

असा विशेष अर्थ अभिप्रेत आहे. स्वभावोक्तीला आवश्यक असणारी कविप्रतिभा आणि विदग्धता हेच तिला 'अलंकारत्व' प्राप्त करून देतात. म्हणून कुन्तकाने कथन केलेले तिचे 'अलंकार्यत्व' आपोआपच गळून पडते आणि स्वभावोक्तीचे 'अलंकारत्व' सिद्ध झाल्याने संकर, संसृष्टीरूप इतर संदेहही सहजच दूर होतात.

कुन्तकाच्या विचारांची संभ्रान्ती ही 'स्वभावोक्ती'ला 'वक्रोक्ती'च्या विरुद्ध उक्ती मानल्याने निर्माण झालेली आहे, हेही लक्षात येते.

-----------------------------

## संदर्भसूची

1. वक्रोक्तिजीवित, संपा. डॉ. नगेन्द्र, व्याख्याकार आचार्य विश्वेश्वर, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, प्र. आ. 1995, 4,5 अंतरश्लोक
2. तत्रैव, पृ. 52
3. तत्रैव, 3.11
4. तत्रैव, पृ. 53
5. वक्रोक्तिजीवित, 1/6
6. तत्रैव, पृ. 53
7. तत्रैव, 1/12
8. तत्रैव, पृ. 54
9. तत्रैव, पृ. 57
10. काव्यप्रकाश, प्रा. कृष्ण अर्जुनवाडकर, प्रा. अरविंद मंगरुळकर, देशमुख प्रकाशन, पुणे, प्र.आ. 1962, पृ. 90
11. तत्रैव, पृ. 605
12. भारतीय साहित्यशास्त्र, डॉ. ग. त्र्यं. देशपांडे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, तृ. आ. 1980, पृ. 402
13. तत्रैव, पृ. 605
14. अलंकाररत्नाकर, संपा. सी. आर्. देवधर, ओरिएंटल बुक एजन्सी, पुणे, प्र.आ.,1942,पृ. 184

-------------------------------